महाराष्ट्र शासन,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर
सेंट्रल एव्हेन्यु रोड, रेल्वे स्टेशन जवळ, नागपूर-४४००१८
कार्यालय दुरध्वनी क्र.०७१२-२८२०२०० फॅक्स क्र.०७१२-२७८०२८
इमेल आयडी- igmcn@rediffmail.com वेबसाईटः- igmc.org

जा.क्र.इंगाशावैम/वैअधिकारी/रिक्तपदे/जाहिरात/4073/२०२५ दिनांकः-१०.०४.२५

## -: जाहिरात :-

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर या संस्थेच्या अंतर्गत असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केन्द्र, इंदोरा,नागपूर येथिल खालील विषयातील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पद निव्वळ कंत्राटी स्वरुपात भरण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील विषयातील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरेपर्यंत किंवा बदलीने नियमीत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर, भरण्याकरिता दिनांक १५/०४/२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता प्रत्यक्ष मुलाखती **(walk-in-interview)** अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या कक्षामध्ये घेण्यात येणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ११.०० वाजता **(walk-in-interview)** करिता, अधिष्ठाता यांच्या कार्यालयात सर्व मुळ शैक्षणिक कागदपत्रासह उपस्थित राहावे.

### रिक्त पदाचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पदाचे नांव | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी विशेषज्ञ | रेडिओलॉजी विभाग | ०१ | एमबीबीएस एमडी/डीएमआरडी |

### पात्रता व नियम:-

१) वैद्यकीय अधिकारी विशेषज्ञ उमेदवारांची नियुक्ती ही दिनांक ३०.१२.२०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अधिन राहून दरमहा एकत्रित रुपये ८५०००/-या ठोक मानधनावर राहिल, व इतर कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत. तसेच वैद्यकीय अधिकारी जनरल डयुटी उमेदवारांची नियुक्ती दरमहा एकत्रित रुपये ७५०००/- या ठोक मानधनावर राहिल, व इतर कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

२) मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय राहणार नाही, तसेच मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता या कार्यालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

३) वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरिता ३८ वर्ष व मागास प्रवर्गाकरिता ४३ वर्ष राहील. उमेदवार मागास प्रवर्गात असेल तर जात व जातवैधता प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

Scanned with OKEN Scanner

४) वरिल पदामध्ये बदल, पदसंख्या,नियम,अटी व शर्ती, निवड झालेल्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश प्रलंबीत ठेवणे तसेच जाहिरात रद्द करणे याबाबत अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत.

५) नियुक्तीचा कालावधी हा १२० दिवसाचा राहिल, काम समाधानकारक असल्यास पुढील १२० दिवसाकरिता खंड देवून मुदतवाढ देण्यात येईल.

६) नियुक्ती सोडावयाची असल्यास १ महिना पूर्व सुचना देणे अनिर्वाय राहिल अथवा त्या महिन्याचे वेतन कपात केले जाईल.

७) शासनाचे बंधमुक्त नियुक्तीकरिता हे पद ग्राहय धरल्या जाणार नाही.

८) ही रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरेपर्यंत किंवा बदलीने नियमीत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात जे आधि घडेल तोपर्यत कंत्राटी तत्वावर करण्यात येत आहेत.

९) नियुक्ती दरम्यान आपल्याला कोणताही खाजगी व्यवसाय करता येणार नाही. त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र कार्यालयाला सादर करावे लागेल.

१०)ही नियुक्ती निवासी वैद्यकीय अधिकारी नियुक्तीच्या नियमानुसार करण्यात येत आहे.

११)शासनाकडून नियमीत / बंधपत्रीत उमेदवार प्राप्त झाल्यास आपली नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल.

अधिष्ठाता,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

Scanned with OKEN Scanner